# १.१९९१ नंतरचे जग

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

**(१) १९८९ नंतर आंतरराष्ट्रीय संबंधांमधील महत्त्वाचा प्रवाह-**
**उत्तर-**
**(अ) द्विध्रुवीयतेचा अस्त**
(ब) आशियामध्ये प्रादेशिकतावादाचा उदय
(क) अलिप्ततावादाचा अंत
(ड) नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी


**(२) मास्त्रीक्त करार संदर्भ-**
**उत्तर-**
(अ) संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दल
**(ब) युरोपीय संघ**
(क) अमेरिकेचा कुवेतमध्ये हस्तक्षेप
(ड) ब्रिक्सची स्थापना

**(ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा :**

**(१) जेव्हा एक राज्य इतर राज्यांवर लष्करी ताकदीच्या वापराशिवाय प्रभाव पाडते**
**उत्तर:** महासत्ता

**(२) जागतिक घडामोडींवर प्रभाव टाकण्याची व स्वतःचे हित साधण्याची क्षमता तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे स्थान असलेले राज्य -**
**उत्तर:** सॉफ्ट पॉवर


**प्र.२(अ) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा.**
**(१) (Kindly rotate your phone)**




**_बिम्सटेक देश**

**बांग्लादेश**
**भूटान**
म्यानमार
भारत
**नेपाळ**
**श्रीलंका**
थायलंड

**(२) (Kindly rotate your phone)**
**उत्तर:**




**शांघाय सहकार्य संघटनेचे**
**संस्थापक**

चीन
**रशिया**
**किरगिझस्तान**
**ताजिकिस्तान**
**कझाकस्तान**
उझबेकिस्तान

**(ब) पाठातील नकाशांचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**



**(१) शेंगेन क्षेत्रातील कोणत्याही पाच देशांची नावे लिहा.**
**उत्तर:** फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, इटली आणि जर्मनी हे शेंगेन क्षेत्रातील चार देश आहेत.

**(२) युरोपीय महासंघाचे सदस्य नसलेल्या मात्र शेंगेन क्षेत्रात असलेल्या कोणत्याही दोन देशांची नावे लिहा.** **उत्तर:** स्वीडन आणि पोलंड हे युरोपीय महासंघाचे सदस्य नसलेले देश आहेत.

**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा,**

**(१) दक्षिण आशियातील व्यापारासाठी सार्क महत्त्वाचे आहे.**
**उत्तर:** वरील विधान बरोबर आहे.
**कारण:** दक्षिण आशिया मुक्त व्यापार व्यवस्था सन २००६ साली कार्यान्वित झाली.

**(२) मास्त्रीक्त करार युरोपच्या संरक्षणासाठी करण्यात आला.**
**उत्तर:** वरील विधान चूक आहे.
**कारण:** युरोपीय युनियन स्थापन करण्यासाठी मास्त्रीक्त करार करण्यात आला होता.

**(३) १९८०च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.**
**उत्तर:** वरील विधान चूक आहे.
**कारण:** १९९०च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.

**प्र.४आपले मत नोंदवा.**

**(१) मानवतावादी हस्तक्षेप.**
**उत्तर:** संयुक्त राष्ट्र द्वारा युद्धग्रस्त क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्यासाठी मानवतावादी हस्तक्षेप आवश्यक आहे. भारताने अशा हस्तक्षेपाचे समर्थन केले आहे. कंबोडियात शांतता प्रस्थापित करण्याच्या आणि युद्धग्रस्त क्षेत्रातील जनजीवन सामान्य करण्याच्या मार्गात भारताने महत्त्वाची भूमिका पार पाडली.

**(२) आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रादेशिकतावाद.**
**उत्तर:** १९९० च्या दशकात आंतरराष्ट्रीय राजकारणातील अमेरिकेच्या आधिपत्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या आव्हान देण्याचा संघटित प्रयत्न अन्य देशांनी केला आहे. एकुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवर नियंत्रण प्रस्थापित करणे गरजेचे आहे. याच जाणिवेतून युरोपियन युनियनची स्थापना झाली. त्याचप्रमाणे रशिया, चीन, भारत, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका या देशांच्या BRICS या संघटनेची स्थापना झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रादेशिकतावादाद्वारा सत्ता संतुलन जोपासले जाईल आणि अमेरिका सारखी महासत्ता आपली मनमानी करू शकणार नाही.

**प्र. ५ खलील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**(१) सॉफ्ट पॉवर म्हणजे काय ते उदाहरणांसह स्पष्ट करा.**
**उत्तर:** (१) अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जोसेफ नाय याने सॉफ्ट पॉवर (Soft power) ही संकल्पना प्रतिपादित केली आहे.
(२) सॉफ्ट पॉवर म्हणजे अशी क्षमता की ज्यामुळे विशिष्ट देशाला जे हवे आहे ते अन्य देशांनाही हवेसे वाटते.
(३) सॉफ्ट पॉवरमध्ये सक्तीच्या ऐवजी आकर्षण निर्माण करून आपली उद्दिष्टे साध्य करण्याची क्षमता असणे.
(४) अमेरिकेच्या सॉफ्ट पॉवरची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत:
(अ) शैक्षणिक देवाण-घेवाण कार्यक्रमाद्वारा अमेरिकेत अन्य देशांतून बुद्धिमान विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येत आकर्षित करण्यात आले आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर बहुसंख्य विद्यार्थी अमेरिकेत स्थायिक होतात. त्याद्वारा अमेरिकेत उच्चशिक्षित तंत्रज्ञ उपलब्ध होतात.
(ब) आंतरजालच्या माध्यमातून अमेरिकेला अभिप्रेत असलेल्या उदारमतवादी लोकशाही व अभिव्यक्ती स्वातंत्र्य या विचारांचा प्रसार जगभर झाला आहे.

(क) मॅकडोनाल्ड, सबवे, पिझ्झाहट, बर्गर किंग इत्यादी फूड चेन्स द्वारा अमेरिकन खाद्य संस्कृतीचा जगभर प्रसार झाला आहे.

**प्र.६ पुढील प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.**

**युरोपीय महासंघ याबाबत पुढील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा.**
**(अ) इतिहास (ब) युरोपियन आयोग (क) युरोपियन संसद (ड) युरोपियन परिषद (इ) युरोपियन न्यायालय**
**उत्तर:** युरोपियन महासंघ European Union चे विवरण पुढीलप्रमाणे आहे:
**(अ) इतिहास:** दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपीय देशांनी आर्थिक समन्वय प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने सन १९५१ मध्ये युरोपीय कोळसा व पोलाद समुदाय सन १९५७ मध्ये युरोपीय आर्थिक समुदाय आणि सन १९५८ मध्ये युरोपीय अणुऊर्जा समुदाय या संघटना स्थापन केल्या. या संघटना एकमेकांत विलीन होऊन युरोपीय बाजारपेठेची आणि मीस्त्राक्त कराराद्वारा सन १९९२ मध्ये युरोपीय महासंघाची स्थापना झाली.
**(ब) युरोपियन आयोग**: युरोपियन आयोग ही महासंघाची नोकरशाही-कार्यकारी यंत्रणा आहे. हा आयोग युरोपियन संसदेत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करतो. तसेच युरोपियन संसदेला कायदे करण्यासाठी प्रस्ताव सुचवतो.
**(क) युरोपियन संसद:** प्रत्यक्ष निवडणुकीद्वारा सदस्य देश संसदेच्या ७५१ सदस्यांची पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी निवड करतात. संसद कायदेविषयक देखरेख आणि अर्थविषयक कार्ये पार पाडते.
**(ड) युरोपियन परिषद:** महासंघाच्या सदस्य देशांचे राष्ट्राध्यक्ष किंवा प्रधानमंत्री आणि परराष्ट्र मंत्री यांचा समावेश होतो. परिषदेच्या पूर्णवेळ अध्यक्षाची निवड केली जाते. परिषदेच्या वर्षातून चार सभा आयोजिक केल्या जातात. ही संघटना युरोपीय युनियनला सामाजिक नेतृत्व प्रदान करते.
**(ई) युरोपियन न्यायालय:** युरोपियन युनियनमधील कायद्याचे व करारांचे अर्थ लावणे आणि त्यांच्या आधारे सदस्य देशांतील वादांचा निवाडा करणे ही जबाबदारी युरोपियन न्यायालय पार पाडते. युनियनचे कायदे सदस्य देशांच्या राष्ट्रीय कारयद्यापेक्षा श्रेष्ठ मानले जातात.